या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ११ मे २०२४ | अंक१५२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मराठा समाजाच्या एकीने राजकीय नेते भांबावले - मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील

## माजलगावात सकल मराठा समाजाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन







**प्रतिनिधी/बीड**

माजलगाव - महाराष्ट्रामध्ये लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे . जोरदार प्रचार चालू आहे. गेल्या अनेक दिवसापासून मराठा समाजाची एकी झाली आहे. एकी पाहून राजकीय नेते भांबावले असून देशाचे पंतप्रधान यांना महाराष्ट्रात अनेक सभा घेण्याची वेळ आली आहे.ते सकल मराठा समाज बांधवांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले यावेळी जरांगे पाटील बोलत होते. श्री क्षेत्र नारायण गड येथे येत्या ८ जून रोजी भव्य महा विशाल सभेचे आयोजन केले आहे. या अनुषंगाने माजलगाव शहरातील काव्य हाईट्स येथे सकल मराठा समाज संपर्क कार्यालयाचे उद्घाटन संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते दि. १० शुक्रवार रोजी सायंकाळी सहा वाजता करण्यात आले.

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, जोपर्यंत मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळत नाही व सगे सोयऱ्याची अंमलबजावणी चा कायदा पारित करीत नाहीत तोपर्यंत मराठ्यांचा लढा कायम राहाणार आहे. मराठा समाज कधीच भाजपा विरोधात नव्हता जर भाजपाविरोधात असता तर मराठ्याची १०६ आमदार झाले नसते. आजपर्यंत मराठा समाजाचा राजकीय नेत्यांनी फक्त मतदानापुरताच वापर करून घेतला व मराठा ओबीसी वाद निर्माण केला परंतु आता सर्व मराठा समाज जागृत झाला आहे. एक झाला आहे. महाआघाडी ने सुद्धा आम्हाला काही तुपाचे डबे दिले नाहीत .परंतु त्यांनी त्रास थोडा कमी दिला आहे. या भाजपाने मात्र आताच ताजा त्रास दिला असल्याने ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाचा आरक्षणाला विरोध केला आहे त्यांना या लोकसभेला असे पाडा की त्यांच्या पाच पिढ्या सुद्धा निवडणुका लढणार नाहीत. मराठ्यांनी जशी आता एकी दाखवली तशी यापुढे मतदानातून एकी दाखवा. अजूनही वेळ गेलेली नाही सगे सोयरे अंमलबजावणी करून कायदा पारित करा. नसता येणाऱ्या विधानसभेला आम्ही मैदानात उतरू असा इशारा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला व येत्या ८ जून रोजी श्रीक्षेत्र नारायण गड येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले यावेळी मराठा समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

----

# शुक्रवार पर्यंत १५४२ टपाली मतदान

बीड, दि.10: रविवारपासून सुरू झालेले टपाली मतदान आज शुक्रवार रोजीपर्यंत 1542 इतक्या नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. याअंतर्गत 16 सर्विस मतदार, सुविधा केंद्रतून पोस्टल बॅलेटद्वारे 374 मतदारांनी मतदान केले. आज शुक्रवारी 16 सर्विस मतदारांनी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान केले. अपर जिल्हाधिकारी कार्यालयात उभारण्यात आलेल्या सुविधा केंद्रात 89, गेवराई 42, माजलगाव 25, बीड विधानसभा मतदारसंघातील सुविधा केंद्रात 88, आष्टी 27 केज 51, परळी विधानसभा मतदारसंघात 52 आष्टी असे एकूण 374 नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला.

रविवारपासून सुरू झालेल्या टपाली मतदानाला सुरूवात झाली असून आजपर्यंत 1542 मतदारांनी मतदान केले.

## मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा आणि बांधकाम कामगार संघटनेचा बजरंग बप्पा सोनवणे यांना जाहीर पाठिंबा

(माजलगाव प्रतिनिधी) बीड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवीत असलेले राष्ट्रवादी पक्ष शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा तथा बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील व माजी नगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस यांच्यासह सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विनाशर्त जाहीर पाठिंबा दिला. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. बजरंग बप्पा सोनवणे यांना दिलेल्या जाहीर पाठिंबा पत्रात नमूद केले आहे की, बीड जिल्ह्यातील बीड लोकसभा मतदार संघातून बजरंग (बप्पा) मनोहर सोनवणे यांना इंडिया महाविकास आघाडी, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून निवडून आणायचे आहे. संस्थापक अध्यक्ष या नात्याने मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा तथा बांधकाम कामगार मजूर संघटना व मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एक मतांनी निर्णय घेऊन ही निवडणूक भारत देशाची निवडणूक असल्यामुळे राष्ट्रीय काँग्रेसचे तरुण तडफदार नेते राहुल गांधी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी पक्ष शरद पवार गटाचे जाणते नेते शरद पवार यांचे हात बळकट करण्यासाठी व या सर्वांचे विचार समाजात रुजविण्यासाठी आणि जातीयवादी पक्षांना रोखण्यासाठी बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना बीड लोकसभा मतदार संघासाठी निवडून देण्याचा निर्धार केला आहे.




महायुतीच्या उमेदवार बीड लोकसभा मतदार संघच्या ना मा . पंकजाताई मुंडे याना एकता परिषद चा जाहीर पाठिंबा देतानी जिल्हाध्या ज्ञानेश्वर कोरडे भाजपा नेते ज्ञानेश्वर नाना मेडके .

# अल्ताफ शेख यांनी संगीत दिलेल्या लोरी हिंदी चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सोलापूर जिल्ह्यातील छोट्याशा ग्रामीण भागातून पुणे सारख्या मोठ्या शहरात जाऊन चित्रपट दिग्दर्शनाचे बारकावे शिकून दिग्दर्शनासह कथा, पटकथा व गीत लेखन करत चंदेरी दुनियेत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे बीड जिल्ह्याचे जावई अल्ताफ दादासाहेब शेख यांनी लोरी या हिंदी चित्रपटापासून संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही पदार्पण केले. त्यांच्या मेहनतीचे येथेही सोने झाले असून त्यांनी प्रथमच संगीत दिलेला लोरी हा हिंदी चित्रपट संपूर्ण देशभरासह बीड शहरातील संतोषीमाता चित्रमंदिर व आशा टॉकीज येथेही प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला व याच्या गीत संगीतालाही प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चित्रपट चांगली गर्दी खेचत आहे. अल्ताफ शेख यांनी पदार्पणातच सुमधूर संगीत दिल्याने अभिनेत्री जागृती जाधव आणि खोपोली महानगरपालिकेचे अधिकारी जाधव यांनी अल्ताफ शेख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. लोरी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने पाच दिवसांत साडेचार कोटींचा गल्ला जमा केला आहे. माऊथ पब्लिसिटीमुळे चित्रपट दुसऱ्या आठवड्यात सिनेमागृहात अजून जास्त गर्दी खेचेल असा अंदाज आहे. चित्रपटातील उर्मिला धनगरी यांनी गायलेल्या हुक्का बड़ा नशीला आणि सुप्रसिद्ध अनुभवी पार्श्वगायक सुरेश वाडकर यांनी गायिलेले ममता की मुरत ही गाणी प्रेक्षकांच्या चांगल्याच पसंतीस उतरली आहेत.

# बीड विधानसभा मतदारसंघात टपाली मतदान



बीड, दि. 10 :- बीड विधानसभा मतदारसंघात तहसील कार्यालयात तसेच अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालय परिसरात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी पोलीस कर्मचारी अथवा निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील परिसरात बीड जिल्ह्यातील इतर तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुविधा केंद्राद्वारे पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी तथा टपाली नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यावेळी उपस्थित होते. बीड लोकसभा मतदारसंघात एकूण झालेले टपाली मतदानाची स्ट्राँग रूम या ठिकाणी आहे. सोमवार दिनांक 13 मे रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडल्यानंतर झालेले टपाली मतदान शासकीय तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात येणार आहे. दिनांक 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे. यावेळी सर्वप्रथम टपाली मतदान मोजण्यात येईल. त्यानंतर विधानसभा मतदारसंघ निहाय मतमोजणी करण्यात येईल.

# बीडमधून सोनवणेंना दिल्लीला पाठवा-शरद पवार




**(बीड प्रतिनिधी)**

पंतप्रधान मोदी यांना लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात धोका आहे, असे वाटत असल्याने त्यांनी या राज्यावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे असा हल्लाबोल करत बीडमध्ये बजरंग सोनवणे यांना दिल्लीला पाठवा, असे अवाहन शरद पवार यांनी गुरुवारी (दि.९) येथे केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत शरद पवार बोलत होते. या प्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार रजनी पाटील, यांच्यासह माजी खासदार व आमदार उपस्थित होते.मागील १० वर्षापासून देशाची सत्ता यांच्या हातात आहे. दिल्लीमध्ये उत्तम राज्य चालवत असलेले अरविंद केजरीवाल हे चांगले सरकार चालवत होते मात्र, त्यांना या सरकारने अडकवण्याचा प्रयत्न केला. असे कधी या देशात झाले नव्हते ते आता होऊ लागले आहे. आम्ही सत्तेत होतो पण, आम्ही सत्तेतून लोकांच्या जीवनात समृध्दी आणण्याचे काम केले. राहुल गांधी देशात पदयात्रा काढली, त्यांच्या घराण्याचा या देशासाठी त्याग विसरू शकत नाहीत, या गांधी घराण्याने देश लोकशाहीच्या मार्गावर नेला.हीच लोकशाही धोक्यात आणण्याचे काम या सरकारमध्ये सुरू असल्याचा आरोपही शरद पवारांनी केला. बीडमध्ये बजरंग सोनवणे निवडूनयेतील असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

- - -

देशावर कर्जाचा बोजा वाढला: पाटील

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, या सरकारने सर्व समाज अस्थिर करून जाती,जातीत भांडणे लावण्याचे काम केले. त्यांच्या या कारभारामुळे राज्यात महाविकास आघाडीच्याकुठल्याच समाजात अस्थिरता राहिली नाही, पंतप्रधानांनी पुढे काय करणार हे सांगायला हवे होते. ते न सांगता टिका करण्यावर भर, मुठभर लोकांना श्रीमंत करण्याचा प्रयत्न हे सरकार करीत आहे. याला जनतेचा विरोध आहे. खताच्या किंमती वाढल्या, भाव वाढविण्याची यांची मानसिकता आहे. देशावर कर्जाचा बोजा वाढला आहे. राज्यातल्या या सरकारने विकासाऐवजी पक्ष फोडण्याचे काम केले. यावेळी राजेश टोपे, बजरंग सोनवणे, संदीप क्षीरसागर, पृथ्वीराज साठे, शेख महेबुब, राजेसाहेब देशमुख, अजय बुरांडे, सुनिल धांडे, दिपक केदार, सक्षणा सलगर आदींची भाषणे झाली. यावेळी खासदार फौजिया खान, माजी मंत्री जयसिग गायकवाड, उषा दराडे, राधाकृष्ण होके पाटील, सुशिला मोराळे, राजेंद्र जगताप, फुलचंद कराड, सय्यद सलिम आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

कोण काय म्हणाले....

अनिल देशमुख : विदर्भात दोन टप्प्यातील मतदानांत मतदारांचा प्रतिसाद पाहता सर्व उमेदवार महाविकास आघाडीचेच निवडुण येतील. मोदींचा केवळ फोडाफोडीचे राजकारण करताना त्यांनी विकास, शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. कापूस, सोयाबीनला भाव नाही. परदेशातील कापूस आयात केला. आपल्या देशातील कापूस निर्यात न केल्याने भाव पडले. शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केंद्र सरकारने केले. लाव रे तो व्हिडीओ म्हणत नरेंद्र मोदी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु म्हणाणारा व्हिडीओ दाखविला.

खासदार पाटील : मनिमपूरमध्ये अत्याचार होत असताना त्यांना तेथील महिलांना भेटायला वेळ नव्हता. त्यांच्याकडून देशातील महिलांच्या सुरक्षेची हमी कशी घेणार. त्यामुळे इंडिया गठबंधनच्या मागे उभे राहण्याचे आवाहन करत इंडिया आघाडीच सुरक्षित व पारदर्शक सरकार देऊ शकते, असा विश्वास त्यांनी दिला.

## पंकजा केवळ मुंडे साहेबांची मुलगी म्हणून नाही.. तर कर्तृत्व आणि नेतृत्व तेवढेच मोठे असल्याने जिल्ह्याचा आणि राज्याचा विकास करेल . नितीन गडकरी

## तुम्ही पंकजाताईंना खासदार करा, मोदीजी आणि मी डबल इंजिन लावून बीड जिल्हा विकास कामात देशात नंबर एकचा करू..!







**(बीड प्रतिनिधी)**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरीनी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी माजलगावच्या मोंढा मैदानावर जाहीर सभा घेतली. त्यात बोलताना पंकजाताईंना तुम्ही खासदार करा या जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मी स्वत: घेत पालकत्व स्वीकारतो. विकसाच्या प्रक्रियेत बीड जिल्हा देशात नंबर एकचा करून दाखवू हे सांगताना पंकजा केवळ स्व. गोपीनाथ मुंडेची मुलगी म्हणून नव्हे तर तिने राजकारणात आपले कर्तृत्व आणि नेतृत्व सिद्ध करू दाखवले. मोदीजी आणि मी स्वत: डबल इंजिनच्या रूपाने तिच्या पाठीमागे खंबीर पणे उभा राहू हे सांगताना तुम्ही पंकजाताईला दिल्लीला पाठवले तर जिल्ह्यासह राज्याच्या विकासाची ललकार बनवू शकते, कारण विकासासाठी सत्ते सोबत संघर्ष करण्यासाठी तिच्यात क्षमता आहे. राजकारणात माणूस जातीने नाही तर गुणाने मोठा होतो हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन काम करतो. जो करेगा जात की बात, उसको पडेगी भारी लाथ असे सांगत त्यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे हे खऱ्या अर्थाने सामान्य जनतेचे नेते होते. मुंडे- महाजनामुळे राज्यात भाजपाचा विस्तार झाला. माझ्याही राजकीय आयुष्यात त्यांचे मार्गदर्शन लाभले.

आपल्या विस्तारीत भाषणात बोलताना सुरवातीलाच गडकरी म्हणाले काँग्रेस ने देशात 60 वर्ष व्यवस्था चालवताना गरीबी हटवाचा नुसता नारा दिला. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी वीस कलमी कार्यक्रम हाती घेतल्याचे सांगत देशातील सामान्य जनतेला विकासापासून वंचित ठेवले. मात्र अवघ्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसने जे 60 वर्षात केले नाही, ते करून दाखवताना “सबका साथ सबका विकास” सर्व स्तरावर सर्वांगीण विकास करताना या प्रक्रियेत गरीब माणसाला आणून सोडले. देशाची प्रगती खऱ्या अर्थाने यांच्या काळात झाली. कदाचित जास्तीचा विकास केला म्हणूच इंडि आघाडीवाले आमच्यावर बेताल आरोप करतात असे ते म्हणाले.

बीड जिल्ह्यातल्या रस्ते विकासावर मी बोलणार नाही कारण आम्ही काय काम केले हा अनुभव तुम्ही घेतलाच असल्याचे सांगत त्यांनी खासदार प्रीतमताई यांनी पुढाकार घेतलेल्या पकजाताईच्या एका पत्रावर जिल्ह्यातील दहा हजार कोटी रुपये खर्चाच्या रस्ते विकास कामाला मंजूरी दिल्याचे सांगितले. कामाची यादी वाचुंन दाखवताना त्यांनी बीडच्या शिवाजी चौक ते बार्शी नाका सुमारे पाच कोटी रुपय, आष्टी ते अहमदनगर 50 किमीसाठी 640 कोटी रुपय, पोहनेर सिरसाळा 25 कोटी, धारूर आडस 17 किमी, परळी सिरसाळा पांगरी नदीवर मोठा पूल आणि वॉटर स्टोरेज, तर माजलगाव केज धारूर रस्ता खराब झाला. तो गुत्तेदारांमार्फत दुरुस्ती करून घेण्याची हमी दिली. सी आर एम योजने अंतर्गत करोडो रुपय दिल्याचे त्यांनी सांगितले. बीड जिल्हा विकासाची मी केवळ गॅरंटी नाही तर पालकत्व घेतो. तुम्ही पंकजाताईला मतदान करून दिल्लीला पाठवा. आपला जिल्हा देशात विकासाच्या बाबतीत नंबर एकचा बनवल्या शिवाय राहणार नाही हे सांगताना पंकजा माझी मुलगी असल्याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला. राजकारणात जाती पातीचे प्रयोग समाजासाठी घातक ठरू शकतात. नेतृत्वाच्या अंगी असलेले गुण आणि कर्तुत्व हा विचार मतदारांनी करायला हवा. गोपीनाथराव मुंडेची आठवण काढत त्यांनी माझ्या राजकीय जीवनात त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. रात्री बारा वाजता कोणाचा फोन आला तर, उचलून सामान्य लोकांची कामे करणारा नेता म्हणजे मुंडे साहेब. माणसं जातीच्या आधारावर नाही तर, कर्तुत्वाच्या आधारवार मोठी होत असतात. पंकजाताईचे कर्तुत्व आणि नेतृत्व क्षमतेचे असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यासह मारठवाड्याचा आणि राज्याचा विकास झाल्या शिवाय राहणार नाही हा विश्वास त्यांनी दिला.

### 10 हजार कोटी रस्ते विकासाला दिल्या बद्दल, पंकजाताईने गडकरींची मानले आभार ..!

या जाहीर सभेत भाषणाच्या सुरवातीलाच आदरणी गडकरी असा उल्लेख करत नितीन गडकारींनी माझ्या वडिलांच्या सोबत राजकीय जीवनात काम केले. माझ्यासाठी ते नेता नसून काका असल्याचा उल्लेख त्यांनी केला. विकासाचे महापुरुष अशी ओळख त्यांची असून आपल्या बीड जिल्ह्यात रस्ते विकासासाठी केंद्रात सरकार आल्यानंतर माझ्या एका पत्रावर सुमारे दहा हजार कोटी काम मंजूर केल्याबद्दल त्यांनी जाहीर सभेत त्यांचे आभार मानले. बीड जिल्ह्यात आम्हाला तरुणांना रोजगार मिळावा महणून एक मोठा उद्योग आणि गरिबांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सर हॉस्पिटल उभा करायचे असून आमचे पालकत्व स्वीकारावे असे सांगत राजकारणात काम करताना मी केवळ विकासाचे राजकारण केल्याचा उल्लेख त्यांनी केला. या सभेला भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर,आ.प्रकाश दादा सोळंके, आ.लक्ष्मण पवार, मोहन जगताप, रमेशराव आडसकर, देविदास राठोड, बाबुराव पोटभरे, नितीन नाईकनवरे, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, अरुण आबा राऊत, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन शहर अध्यक्ष दळवी यांनी मांडले. अक्षय तृतीयाचा दिवस असताना देखील मोंढा मैदानावर पार पडलेल्या सभेला मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

# आपले अंतकरण स्वच्छ करा देव आल्याशिवाय राहणार नाही सिद्धेश्वर महाराज बागलाने यांचे प्रतिपादन.

## सामान्य रूपाने देव हा सर्वत्र राहतो

बीड प्रतिनिधी - प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी ओम श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे श्री ह भ प महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन केले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प सिद्धेश्वर महाराज बागलाने यांची संपन्न झाली. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज तात्या, श्री ह भ प प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री श्री ह भ प हनुमंत महाराज घोलप, ॲड. संतोष घोलप यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती. यावेळी महाराजांनी आपल्या वाणी मधून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. देव प्राप्त म्हणजे सर्व सुख होय आपले अंतकरण स्वच्छ करा देव आल्याशिवाय राहणार नाही. येथे वै.गुरुवर्य माऊली दादांच्या पदस्पर्शाने या भूमित पुण्याचे उभे पीक आले आहे. असे प्रतिपादन यावेळी महाराजांनी भाविकांना संदेश देतांना केले आहे. देव हा पंढरीस परमात्मा घ्यावा, देव हा सुखा करता घ्यावा, देव हा किर्ती संपन्न होण्याकरिता घ्यावा.



जग नाही बदलले माणूस बदलला आहे.सामान्य रूपाने देव हा सर्वत्र राहतो. देव हा हृदयामध्ये राहतो असे यावेळी महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना संदेश दिला. महाराजांनीदेवघ्याकोणीदेवघ्याकोणी ।आइताआलाघरपुसोनी देव न लगे देव न लगे । सांठवणाचे रुधले जागे देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं दुबळा तुका भावेंविण । उधारा देव घेतला ऋण या अभंगावर महाराजांनी आपली सेवा संपन्न केली. आहो,देव घ्या कोणी,देव घ्या कोणी तो देव आयता घर विचारीत आला आहे असे मी म्हणले तर मला लोक म्हणाले देव नको,देव नको कारण आमच्या घरी देवाला राहण्यासाठी जागा शिल्लक नाही असे लोक मला म्हणू लागले. आहो,लोकहो देव मंदावला,देव मंदावला म्हणजे देवाचा भाव कमी झाला मी काय करू?आहो,लोकहोदेव फुकट घ्या,देव फुकट घ्या त्याला काही दमडी किंमत नाही.तुकाराम महाराज म्हणतात भावेविण मी दुबळा आहे,उधार मागून घेतला आहे,केवढे हे ऋण माझ्या डोक्यावर आहे. बाळनाथ बाबा आणि माऊली दादांच्या रूपाने आपल्याला संत मिळाले आहेत. असे यावेळी महाराजांनी आपल्या वाणीतून भाविकांना सांगितले. यावेळी मृदंगाचार्य अमोल महाराज पवार श्री क्षेत्र चाकरवाडी, प्रशांत महाराज शेळके, गणेश महाराज भोसले खरडेवाडीकर,अविष्कार महाराज क्षीरसागर, गायनाचार्य राधाकृष्ण महाराज माखले, रोडे महाराज, त्रिंबक महाराज शेळके,अनिकेत महाराज आणवणे, हनुमंत महाराज घोलप आणि उपस्थित गावचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार बाबासाहेब मोरे, प्रेम कुमार अनवणे आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे संत बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात कीर्तन करताना ह .भ.प सिद्धेश्वर महाराज बागलाने आणि हजारोंच्या संख्येने भाविक भक्त..

# कुस्तीपटू भूषण लहामगेची हत्या.

प्रतिनिधी नाशिक इगतपुरी महामार्गावर विल्होळी जवळ राजुर फाटा येथे पंजाबी ढाब्याजवळ दिवसाढवळ्या शुक्रवार (१०)रोजी एका महाराष्ट्र केसरी कुस्तीपटू ची हत्या करण्यात आल्याची मोठी बातमी आहे .भूषण दिनकर लहामगे (40 )असे हत्या झालेल्या कुस्तीपटूचे नाव आहे. भूषण हा सकाळपासून काही कामाकरता नाशिक येथे आला होता . व काही बाजार करून व शहरातील सिडको येथील चक्कीतून म्हसी साठी पीठ घेऊन तो आपल्या दुचाकीवरून आपले गावी सालेगाव येथे जात असताना रस्त्यात दोन मारेकरी हे दुचाकी क्रमांक एम



एच 15 इ 76 74 वर आले, व दोन मारेकरी घ ट ने च्य ा ठिकाणी दवा दळून बसले होते, त्यांनी भू ष ण ल ा रस्त्यात अडवून पहिले त्याच्या पाठीवर दोन गोळ्या झाडल्या व नंतर धारदार शस्त्राने त्याच्यावर वार केले व दुचाकी सोडून ते इगतपुरीच्या दिशेने प्रसार झाले. यात भूषणचा जागीच मृत्यू झाला. भूषण हा इगतपुरी तालुक्यातील कुस्तीपटू म्हणून प्रसिद्ध होता त्याने जिल्हास्तरावर कुस्ती स्पर्धेत अनेक पारितोषिक पटकावले होतेत्र्ञ . हत्ये नंतर वाडीवरे व ग्रामीण पोलीस घटनास्थळी हजर झाले व भूषणचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवाविच्छेदन करिता आणण्यात आला दरम्यान भूषण चे नातेवाईक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

## बीड विधानसभा मतदारसंघात टपाली मतदान



बीड, दि. 10 :- बीड विधानसभा मतदारसंघात तहसील कार्यालयात तसेच अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालय परिसरात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी पोलीस कर्मचारी अथवा निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील परिसरात बीड जिल्ह्यातील इतर तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुविधा केंद्राद्वारे पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी तथा टपाली नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यावेळी उपस्थित होते. बीड लोकसभा मतदारसंघात एकूण झालेले टपाली मतदानाची स्ट्राँग रूम या ठिकाणी आहे. सोमवार दिनांक 13 मे रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडल्यानंतर झालेले टपाली मतदान शासकीय तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात येणार आहे. दिनांक 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे. यावेळी सर्वप्रथम टपाली मतदान मोजण्यात येईल. त्यानंतर विधानसभा मतदारसंघ निहाय मतमोजणी करण्यात येईल.

# आदिवासी समाज विकास मंचाचा पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा

(परळी प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील आदिवासी समाजाची संवाद बैठक परळी वैजनाथ येथे होऊन माननीय धनंजय मुंडे साहेब माननीय वाल्मीक अण्णा कराड यांनी आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले माननीय शंकर गंगाधरे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी समाज विकास मंच महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा कार्यकारणीची बैठक होऊन सरानुमते महायुतीच्या उमेदवार माननीय पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना बीड जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा पाठिंबा जाहीर केला



यावेळी बीड जिल्हाध्यक्ष शंकर गंगाधरे, नगरसेवक मा.केशव भाऊ बळवंत व युवा नेते अंगद भाऊ गंगाधरे हे कार्यक्रम चे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सुशील बळवंत, महेश बळवंत, सुभाष विभुते,मनीष माने,साईनाथ माने, श्रीकांत गंभीरे,सुदर्शन प्रमोद बळवंत,पवन बळवंत ,गजानन गंगाधरे, अजय गंगाधरे,रुक्मिणी मन्नाळे राजाराम तोरडमल, विनोद अकुलवाड गजानन मन्नाळे, ज्योतीराम कानडे, सागर गंगाधरे, विभुते,श्रीनाथ गंजेवार,श्रीनाथ दशवंत, आदित्य शिंदे,अनिकेत शिंदे,आदित्य बळवंत,विशाल जाधव, साईनाथ पवार, गणेश माने, बाळासाहेब बळवंत,पंकज बळवंत, संकेत गंगाधारे,विभुते, आदित्य शिंदे, राजेभाऊ दशवंत, सोनाजी जाधव, अभिषेक पवार, संजय जाधव, मनीष माने, अभिषेक विभुते, श्रीनिवास कांबळे, धनंजय गोतावळे,अशोक कांबळे, भागवत तलवारे ,सोनू चितापुरे, संतोष लांडगे, महादेव सुरवसे, शिवाजी सुरवसे, आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते..!!

# जिल्ह्यातील घराणेशाही संपवण्यासाठी बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्या- योगेश गाडे

गेवराई | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील घराणेशाही संपून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी साध्या शेतकरी पुत्राला देशातील सार्वभौम संसदेमध्ये पाठवण्यासाठी बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड बहुमताने जनतेने निवडून द्यावं असा आवाहन सामाजिक कार्यकर्ते योगेश गाडे यांनी केल. आहे साधी राहणीमान, उच्च विचारसरणी आणि प्रत्येक व्यक्ती शी जोडलेली नाळ ह्या मुळे सर्वांना परिचित असणारे बजरंग बप्पा सोनवणे एकदा संसदेत जाण्याची संधी जनतेने दिली तर निश्चितच जिल्ह्याचा विकास ते करतील असा विश्वास गाडे यांनी व्यक्त केला असून सामान्य बहुजन जनतेने त्यांना निवडून देण्यासाठी हि निवडणुक हाती घेतली आहे.बजरंग बप्पा सोनवणे यांचा दांडगा संपर्क आजी - माजी पदाधिकारी कार्यकर्ते, युवक, युवती ज्येष्ठ नागरिक तसेच महिला न मध्ये बजरंग बप्पा च्या नावांची चर्चा मोठया प्रमाणात होत आहे.. बीड जिल्ह्याचे काही नेते म्हणजे नाव मोठे लक्षण खोटे आहे लाजिरवाणी गोष्ट ही अभिमानाने सांगतात की बीड जिल्हा ऊसतोड कामगाराचा जिल्हा आहे गेले कित्येक वर्ष बीड जिल्ह्याच्या विकासाच्या नावाखाली जनतेला फसवन्यात आलं आहे गेले कित्येक वर्षे बीड जिल्ह्याची रेल्वे येत आहे परंतु अजूनही काम अर्धवटच आहे बीड जिल्ह्यामध्ये कुठलीही एमआयडीसी नाही त्याच्यावर कोणी बोलत नाही बीडमध्ये कुठले उद्योगधंदे नाहीत त्याच्यावर कोणी बोलत नाही नाही बीडमध्ये कुठलेही मेडिकल कॉलेज नाही याच्यावर एकही नेता बोलायला तयार नाही परंतु फक्त विकासाच्या गप्पा मारल्या जात आहेत आणि जातीपातीचे राजकारण करून निवडणुका जिंकल्या जातात विकास मात्र कुठेच झालेला नाही आणि सर्व नेते एका मांडीला मांडी लावून बसत आहेत म्हणून यांना विचारणार ही कोणी राहिलेला नाही त्यामुळे विकास हवा तर पर्याय नवा असंच बीड जिल्ह्याच्या जनतेने ठरवायला हवा बीड जिल्ह्याने अनेक नेते घडवले आहेत परंतु बीड जिल्ह्यासाठी कोणीही



विकासाचं काम केलं नाही एक एका घरांमध्ये वीस वीस पंचवीस पंचवीस वर्षे खासदारकी आमदारकी असून सुद्धा बीड जिल्ह्यासाठी काही करता आला नाही या उलट हा जिल्हा ऊसतोड कामगाराचा जिल्हा आहे म्हणून हेच लोक ओरडून सांगतात परंतु या ऊस तोड कामगारासाठी शेतकऱ्यांसाठी एकही नेता पुढाकार घेत नाही त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये बीडच्या जनतेने या सर्व नेत्यांना यांची जागा दाखवणे आवश्यक आहे जोपर्यंत घराणेशाही संपत नाही तोपर्यंत बीड जिल्ह्याचा विकास होणार नाही त्यामुळे बजरंग बाप्पाच्या रूपाने बीड जिल्ह्याला नवीन एक चेहरा मिळाला आहे त्यामुळे बजरंग बाप्पा सोनवणे ला सहकार्य करून येणाऱ्या लोकसभा निवडणूक मध्ये बदल घडवावा असं मत सामाजिक कार्यकर्ते योगेश गाडे यांनी व्यक्त केल आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार ११ मे २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

लाईफ कॉम्प्युटर्स
सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस
कॉम्प्युटर । लॅपटॉप । प्रिंटर । रिफर्ब लॅपटॉप

9404800081 / 7020240121
www.lifecomputerbeed.com"
बी.एस.एन.एल.ऑफिस च्या बाजुला,डी.पी.रोड, बस स्टॅंड्या मागे,बीड

# महाराष्ट्रात काही जिल्ह्यांमध्ये धो-धो पाऊस बरसणार, भर उन्हाळ्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट.



ऐन उन्हाळ्यात महाराष्ट्रात अवकाळी पावसाच्या सरी बरसल्या आहेत. पुण्यातील कात्रज, स्वारगेट आणि कोंढवा या भागात पाऊस सुरु आहे. तर सांगलीच्या वळवा तालुक्यातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला आहे. गारपिटीमुळे आंबा पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अहमदनगर आणि पारनेर या ठिकाणी देखील पाऊस पडला आहे. याशिवाय पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडू शकतो, याबाबत महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे.पुणे जिल्ह्यात आज पाऊस पडतोय. पुण्यातील अनेक भागांमध्ये पाऊस पडतोय. पण पुण्यात फक्त आजच नाही. तर पुढचे दोन दिवस जास्त महत्त्वाचे असणार आहेत. कारण पुणे जिल्ह्यासाठी आज हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला होता. पण पुढच्या दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे पुढच्या दोन दिवसांमध्ये पुण्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुण्यात 11 आणि 12 मे या दोन दिवशी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर 13 आणि 14 तारखेसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.आणखी कुठे-कुठे पावसाची शक्यता? सातारा जिल्ह्यात 12 मे या तारखेसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच नांदेड, लातूर, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांसाठी देखील 12 तारेखासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, गारपीट आणि सोसाट्याचा वारा पाऊस पडण्याची शक्यता आहे. सांगलीत गारपिटसांगलीच्या वाळवा तालुक्यातील काही भागांना वादळी वारा आणि गारपिटासह पावसाने झोडपले आहे. सांगलीच्या वाळवा तालुक्यात आज सकाळपासूनच उन्हाचा पारा चाळीसच्यावर गेलेला होता. दुपारपासून आभाळ आले होते. विजांचा कडकडाट, वादळासह 20 मिनिटे गारांचा अवकाळी पाऊस झाला. गारपिटीमुळे या परिसरातील आंब्याचे भाजीपाला पिकाचे नुकसान झाले.

या परिसरातील विहिरी कुपनलिका यांनी तळ गाठला होता. आज झालेल्या अवकाळी पावसामुळे हवेत गारवा आल्याने बळीराजा सुखावला आहे. पण बळीराजाला मोठ्या पावसाची आवश्यकता आहे. त्यामुळे मशागत करता येणार नाही.

## अशोक हिंगे पाटील यांनी गोविंद मस्के कुटुंबियांची घेतली सांत्वन भेट

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई शहर अध्यक्ष गोविंद आबा मस्के यांच्या वडिलांचे अल्पशः आजाराने दुःखदनिधन झाले. बीड लोकसभेच्या प्रचार दौऱ्यात वेळात वेळ काढून अशोक हिंगे पाटील यांनी कबीर नगर मस्के कुटुंबीयांच्या घरी सांत्वन भेट दिली. त्याप्रसंगी जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, बालाजी जगतकर, अजय सरवदे,धम्मानंद कासारे,



बिभीषण चाटे,अनिल डोंगरे,बाबुराव मस्के, अरूण बनसोडे, परमेश्वर लांडगे, चांदभाई, स्वप्निल ओव्हाळ, अभिप्राय मस्के आदी उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचार रथावर अज्ञाताचा हल्ला...तर शहरातील प्रचारार्थ लावलेली पोस्टर फाडली...

**प्रतिनिधी/बीड**

बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार हा 48 तासात थंडावणार आहे यासाठीच उमेदवार मोठ्या ताकतीने आप आपला प्रचार करताना पाहायला मिळतात मात्र वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहर वर लावलेले बॅनर आणि शहरात फिरत असलेले प्रचार रथ यांच्यावर अज्ञातांनी हल्ला चढवत पोस्टर फाडाफाडी केली आहे. बीड जिल्ह्यात प्रचारांची रणधुमाळी चालू असतानाच प्रत्येक जण आपल्या विरुद्ध उमेदवारावर शाब्दिक हार प्रहार करत आहे मात्र या सगळ्या गोष्टीला आता हिंसक वळण लागल्याचं पाहायला मिळते वंचित बहुजन आघाडीचे अंबाजोगाई शहरात




लावलेले फलक हे फाडण्यात आले आहे आणि प्रचार अर्थ फिरत असलेला प्रचार रथ यावर हल्ला करत यावरील वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अँड.प्रकाश आंबेडकरांची फोटो हे फाडण्यात आले आहे यामुळे अंबाजोगाई शहरात काही वेळासाठी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते संतापलेले पाहायला मिळत होते मात्र यावर लवकरात लवकर पोलीस प्रशासनाने या समाजकंटकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते हे करत आहेत अन्यथा जशास तसे उत्तरही आम्ही देऊ शकतो असंही यावेळेस भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

## महावितरणने वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे करावी ,लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रामुळे अपघाताची दाट शक्यता :- डॉ.गणेश ढवळे

बीड:पावसाळ्यात वीजग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा याकरिता बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची रोहित्रांची तपासणी,अर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी,लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता महावितरण विभाग बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस



यांना निवेदनाद्वारे केली आहे. सविस्तर माहितीस्तव

सध्या महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेतील बहुतांश सामग्री उघड्यावर असल्याने वातावरणात होणा-या बदलांचा प्रतिकूल परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होत असतो पर्यायाने त्याचा परिणाम परीणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होत असतो.यामुळे उन्हाळा, अवकाळी पाऊस व त्यानंतर लगेचच सुरू होणारा पावसाळा हा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने सैल झालेले गार्डींग व स्पन घट्ट करणे,दोन खांबामधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे,सर्व खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करणे अपेक्षित आहे.वीज रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे, स्टे वायरने वीजखांबांचा आधार मजबूत करणे,रोहित्रांचे अर्थिंग मजबुत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे अर्थिंग सुस्थितीत करणे, वीज तारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे ,फुटलेले पिन आणि इन्सुलेटर बदलणे, तपासणी व दुरुस्ती करणे,वाहिन्यांचे खराब झालेले लाइटनिंग अरेस्टर बदलणे, भुमिगत वाहिन्यांचे तात्पुरते असलेले जाईंट कायमस्वरूपी करणे, वाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदलणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे , पावसाचे पाणी साचणा-या परीसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढवणे आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे. लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रांमुळे जिविताला धोका बहुतांश रोहित्र उघड्यावर असुन त्यांना संरक्षक कवच नसल्याने पावसाळ्यात निर्माण झालेला हिरवागार चारा चरण्यासाठी आलेली जनावरे विद्युत प्रवाहाचा धक्का लागुन दगावल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. तसेच लोंबकळणा-या तारांमुळे अपघाती घटना घडलेल्या आहेत त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील रोहित्रांची दुरावस्था ; साहित्याची वानवा

ग्रामीण भागातील रोहित्रांची अत्यंत दुरावस्था असुन महावितरण कडुन आवश्यक साहित्य पुरवण्यात येत नसल्याने ग्रामस्थांनाच रात्री अपरात्री वीज गेल्यावर फ्युज टाकावे लागते. महावितरणचे कर्मचारी यांना सुद्धा हॅन्ड ग्लोज तसेच ईतर आवश्यक साहित्य मिळत नसल्याचे वास्तव आहे.त्यामुळे महावितरणने आवश्यक साहित्य पुरवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com